

## आज शिवजयंती

प्रताप विद्या मंदिर येथील उपक्रमशील कलाशिक्षक कमलेश गायकवाड यांनी रंगीत पेन्सिलच्या माध्यमातून महाराष्ट्राचे दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त रेखाटलेले शिवछत्रपतींचे विलोभनीय चित्र.

महाराष्ट्राचे निडर दैनिक

# शौर्य मराठी

RNI-MAHMAR/2023/89125

सेन्सेक्स ८३,७३९.१३ +२,०७२.६७ (२.५४%)
डॉलर ₹ ९०.२२

आजचे तापमान (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३२ | १७ |
| दिल्ली | २२ | १० |
| मुंबई | ३६ | २१ |
| नागपूर | ३० | १६ |
| पुणे | ३२ | १३ |

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | गुरुवार, दि. १९ फेब्रुवारी २०२६ | वर्ष २ रे | अंक १०१ | किंमत : ५ रु. | पाने ४


## सुविचार

जीवन ही एक कविता आहे; प्रत्येक क्षणाला एक सुंदर ओळ मानून जगा.

सुर्योदय - सुर्यास्त
स.-७:०४ संध्या-६:२०

**सोने – चांदी**
सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)
१,५५,४७०/- २,८०,०००/-

**केळी भाव**
नवती : १३५५ ते १३६०
पिल बाग : ११०१ ते ११०२
कांदे बाग : ----

# महाराष्ट्रातील ७ जागांसह देशातील ३७ राज्यसभा जागांच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर

## निवडणुकीसाठी १६ मार्च रोजी मतदान; त्याच दिवशी मतमोजणी

वृत्तसंस्था । दिल्ली

**भारतीय निवडणूक आयोगाने बुधवारी देशातील १० राज्यांमधील राज्यसभेच्या ३७ जागांसाठी द्विवार्षिक निवडणुकींचा कार्यक्रम जाहीर केला आहे. ही निवडणुकीसाठी १६ मार्च रोजी मतदान होणार असून त्याच दिवशी संध्याकाळी मतमोजणी केली जाणार आहे.**



राज्यसभेच्या या ३७ जागा येत्या एप्रिल महिन्यात रिक्त होणारा आहेत. महाराष्ट्र (७), ओडिशा (४), तमिळनाडू (६), पश्चिम बंगाल (५), आसाम (३), बिहार (५), छत्तीसगड (२), हरियाणा (२), हिमाचल प्रदेश (१) आणि तेलंगणा (२) अशी या जागांची संख्या आहे.

राज्यसभेचा कार्यकाळ संपणार असलेल्या नेत्यांमध्ये अनेक बड्या नावांचा समावेश आहे. ज्यामध्ये शरद पवार, केंद्रीय मंत्री रामदास आठवले, काँग्रेसचे नेते अभिषेक मनू सिंघवी, तृणमूल काँग्रेसचे नेते साकेत गोखले, आणि राज्यसभेचे उप सभापती हरिवंश नारायन सिंह यांचा समावेश आहे.

या जागांसाठी २०२० मध्ये द्विवार्षिक निवडणुका झाल्या होत्या.

तेव्हा भारतीय जनता पक्ष आणि त्यांच्या मित्र पक्षांनी आसाम, बिहार, हरियाणा आणि हिमाचल प्रदेशमध्ये मोठे यश मिळवले होते. महाराष्ट्रात या जागा भाजपा, दोन्ही गट एकत्र असलेली शिवसेना, दोन्ही गट एकत्र असलेली राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस यांच्यात विभागलेल्या होत्या.

तमिळनाडूमध्ये डीएमकेच्या नेतृत्वाखालील युतीने बहुतांश जागा जिंकल्या होत्या. पश्चिम बंगालमध्ये तृणमूल काँग्रेसने आणि ओडिशामध्ये बिजू जनता दल यांचा दबदबा दिसून आला होता.

### ➤ असे असेल वेळापत्रक

**निवडणूक आयोगाने जारी केलेल्या वेळापत्रकानुसार, या निवडणुकींचे नोटिफिकेशन २६ फेब्रुवारी रोजी जारी केले जाईल. तर अर्ज दाखल करण्याची अखेरची तारीख ही ५ मार्च असणार आहे. अर्जाची छाननी आणि ही ६ मार्च रोजी केली जाईल आणि अर्ज माघारी घेण्याची अखेरची तारीख ९ मार्च असणार आहे. तर १६ मार्च रोजी सकाळी ९ वाजल्यापासून दुपारी ४ पर्यंत मतदान होईल आणि त्यानंतर ५ वाजता मतमोजणीला सुरूवात होईल. निवडणुकीची प्रक्रिया ही २० मार्चपर्यंत पूर्ण केली जाईल.निवडणूक आयोगाने मतदानाच्या प्रक्रियेबद्दल देखील निर्देश जारी केले आहेत, ज्यानुसार बॅलेट पेपरवर पसंतीक्रम नोंदवण्यासाठी फक्त रिटर्निंग ऑफिसरने पुरवलेला इंटीग्रेटेड व्हायलेट स्केच पेनचा वापर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. मार्च महिन्यात होणाऱ्या या निवडणुकीचा निकाल हा संबंधित राज्य विधानसभांमधील राजकीय पक्षांच्या सद्यसंख्याबळावर अवलंबून असणार आहे. या निवडणुकीच्या निकालांमुळे राज्यसभेच्या रचनेत किरकोळ बदल होऊ शकतात.**


### ग्रामपंचायत निवडणुकांसाठी प्रभाग रचनेचे वेळापत्रक

राज्यातील ज्या ग्रामपंचायतींची मुदत जानेवारी २०२६ ते डिसेंबर २०२६ या काळात संपत आहे, तसेच ज्या नवीन ग्रामपंचायती स्थापन झाल्या आहेत, त्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्रभाग (वॉर्ड) रचनेचा अधिकृत कार्यक्रम राज्य शासनाने जाहीर केला आहे. त्यानुसार येत्या २० फेब्रुवारीपासून प्रभाग रचनेचे काम सुरु होणार असून ग्रामपंचायतींची प्रारुप प्रभाग रचना दि.७ एप्रिल २०२६ रोजी प्रसिध्द केली जाणार आहे. ग्रामविकास विभागाने जाहीर केलेल्या प्रारुप प्रभाग रचनेच्या कार्यक्रमामुळे ग्रामीण भागातील राजकीय हालचालींना वेग येणार आहे. प्रभाग रचनेची प्रक्रिया तीन टप्प्यात पार पडणार असून, त्याची संपूर्ण जबाबदारी तहसीलदार, उपविभागीय अधिकारी आणि जिल्हाधिकारी यांच्यावर सोपवण्यात आली आहे.तहसीलदार गुगल अर्थच्या मदतीने २० फेब्रुवारी २०२६ पर्यंत गावांचे नकाशे अंतिम करतील. तलाठी आणि ग्रामसेवक २७ फेब्रुवारी २०२६ पर्यंत प्रत्यक्ष पाहणी करून प्रभाग निश्चित करतील. जिल्हाधिकाऱ्यांकडून संक्षिप्त तपासणी झाल्यानंतर २३ मार्च २०२६ पर्यंत राज्य निवडणूक आयोग या प्रस्तावाला मान्यता देईल, असे ग्रामविकास विभागाने म्हटले आहे. याबाबतचे आदेश ग्रामविकास विभागच्या सह सचिव वर्षा भरोसे यांनी जारी केले आहेत.

# चीनच्या रोबोडॉगवरील वादाला जबाबदार कोण?

**• गलगोटिया विद्यापीठाने प्राध्यापकांवर फोडलं खापर**

वृत्तसंस्था । दिल्ली



**दिल्लीमधील इंडिया एआय इम्पॅक्ट समिटमध्ये चिनी रोबोडॉगला स्वत:चं म्हणून सादर करणं नोएडामधील गलगोटिया विद्यापीठाला चांगलंच महागात पडलं आहे. यावरून वाद निर्माण झाला असून गलगोटिया विद्यापीठावर मोठ्या प्रमाणात टीका होत आहे. एवढंच नाही तर गलगोटिया विद्यापीठाला इंडिया एआय इम्पॅक्ट समिटमधून स्टॉल सोडण्याचे आदेश देण्यात आले आहेत.**

### गलगोटिया विद्यापीठाने मागितली माफी

गलगोटिया विद्यापीठाने आज (१८ फेब्रुवारी) प्रसिद्ध केलेल्या प्रेस रिलीजमध्ये म्हटलं की, एआय समिटमध्ये निर्माण झालेल्या गोंधळाबाबत आम्ही माफी मागतो. आमच्या पॅव्हेलियनमध्ये काम करणाऱ्या एका प्रतिनिधीला सविस्तर माहिती नव्हती आणि कॅमेऱ्यासमोर येण्याच्या उत्साहात तिने चुकीची माहिती दिली. वादानंतर विद्यापीठाने काय स्पष्टीकरण दिलं?

दरम्यान, चीनच्या रोबोटवरून झालेल्या या वादाला जबाबदार कोण? असा प्रश्न उपस्थित करण्यात आल्यानंतर आता गलगोटिया विद्यापीठाने या वादाचं खापर प्राध्यापकांवर फोडलं आहे. गलगोटिया विद्यापीठाचं म्हणणं आहे की, एका प्रतिनिधीने कॅमेऱ्यासमोर बोलण्याच्या उत्साहात ही खोटी माहिती दिली. माध्यमांशी बोलणाऱ्या कर्मचाऱ्याला अशा प्रकारची चुकीची माहिती देण्याचा अधिकार नव्हता.सोशल मीडियातून टीका झाल्यानंतर विद्यापीठाने रोबोडॉगची त्यांनी निर्मिती केली नसल्याचे स्पष्ट केले. तसेच, हा रोबोडॉग विद्यार्थ्यांच्या शिकवणीसाठी वापरला जात असल्याचे सांगितले. आमचे विद्यार्थी रोबोडॉगसोबत प्रयोग करत आहेत. त्याच्या क्षमता, कार्यपद्धती यांचा अभ्यास करत आहेत. गलगोटियाने या रोबोडॉगची निर्मिती केली नाही आणि आम्ही कधीच तसा दावाही केला नाही, असे विद्यापीठाने एक्सवरुन केलेल्या पोस्टमध्ये म्हटले आहे. दिल्लीतील एआय समिटमध्ये गलगोटिया विद्यापीठाने ओरियन रोबोडॉग प्रदर्शित केला. विद्यापीठाने ३५० कोटी एआय कार्यक्रमांतर्गत त्याची निर्मिती केल्याचे विद्यापीठाच्या प्राध्यापिका नेहा सिंग एका व्हिडीओत सांगत आहेत. हा व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाला. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी देखील हा व्हिडीओ शेअर केला होता. दरम्यान, हा रोबोडॉग चायनीज असल्याचे समोर आले. यानंतर विद्यापीठावर सोशल मीडियातून (पान २ वर)

## थोडक्यात

### ..तर अमोल कोल्हे झाले असते राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष

**मुंबई ।** राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन्ही गट एकत्र येण्याबाबत पडद्यामागे मोठ्या हालचाली सुरू होत्या, असा खुलासा आमदार रोहित पवार यांनी केला आहे. जर दोन्ही गट एकत्र आले असते, तर खासदार डॉ. अमोल कोल्हे यांच्याकडे संयुक्त राष्ट्रवादीच्या प्रदेशाध्यक्षपदाची धुरा सोपवली जाणार होती, असा दावा रोहित पवारांनी केला. यावर आता खुद्द डॉ. अमोल कोल्हे यांनीही शिक्कामोर्तब करत याचा उलगडा केला आहे. पत्रकार परिषदेत बोलताना रोहित पवार म्हणाले की, ङ्कअजित दादांची इच्छा होती की संयुक्त राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष अमोल कोल्हे व्हावेत. यासाठी कोल्हे, सुप्रिया सुळे आणि शशिकांत शिंदे यांनी प्रामाणिकपणे पुढाकार घेतला होता.

### १० वीचा इंग्रजीचा पेपर शिक्षिकेने फोडला

**बऱ्हाणपूर ।** मध्य प्रदेशातील बुऱ्हानपूर जिल्ह्यात दहावीच्या बोर्ड परीक्षेदरम्यान एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. इंग्रजी विषयाचा पेपर सुरू असतानाच एका महिला शिक्षिकेने प्रश्नपत्रिकेचे फोटो काढून ते स्वतःच्या व्हॉट्सअॅप स्टेटसवर पोस्ट केल्याने खळबळ माजली आहे. याप्रकरणी संबंधित शिक्षिकेसह परीक्षा केंद्र प्रमुखांवर निलंबनाची कारवाईसह गुन्हाही दाखल करण्यात आला आहे. प्राथमिक शिक्षिका राजकुमारी सोनी यांच्या व्हॉट्सअॅप स्टेटसवर इंग्रजीच्या प्रश्नपत्रिकेचे फोटो दिसून आले. एका गैरहजर विद्यार्थ्याच्या टेबलावरील प्रश्नपत्रिकेचे फोटो शिक्षिकेने काढल्याचा आरोप आहे. हे फोटो त्यांनी अन्य एका व्यक्तीला पाठवले होते, जेणेकरून उत्तरे मिळवून विद्यार्थ्यांना कॉपी पुरवता येईल.

## चार खत कंपन्यांविरुद्ध गुन्हा दाखल

# कोपरगावमध्ये ६.२४ लाखांचे बनावट खते जप्त

वृत्तसंस्था । राहता

**बोगस खते घेऊन वैजापूरच्या दिशेने जाणाऱ्या मालट्रकवर कारवाई करून ६ लाख २४ हजार रुपये किंमतीचे २३.८५ मेट्रिक टन संशयित रासायनिक खत जप्त करण्यात आले. ही कारवाई कोपरगाव– वैजापूर रस्त्यावर मंगळवारी रात्री करण्यात आली. या संदर्भात कोपरगाव पोलीस ठाण्यात ट्रक चालकासह, पुणे, पंढरपूर व गुजरात येथील संबंधित चार खत कंपन्यांच्या व्यवस्थापकीय संचालकांविरुद्ध गुन्हा दाखल केल्याची माहिती कोपरगाव शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रामकृष्ण कुंभार यांनी दिली.**



कोपरगाव तालुक्यातील संवत्सर शिवारातून बोगस खतांची मालमोटार वैजापूरच्या दिशेने जाणार असल्याची गोपनीय माहिती मिळाल्यानंतर कोपरगाव कृषी विभाग व कोपरगाव शहर पोलिस यांचे संयुक्त पथक कारवाईसाठी (पान २ वर)

➤ याबाबत गुण नियंत्रक निरीक्षक बिरदवडे यांनी पोलिसांकडे फिर्याद दिली. खत (नियंत्रण) आदेश १९८५ मधील विविध तरतुदी तसेच अत्यावश्यक वस्तू अधिनियमाचे उल्लंघन केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला. विहित मानकांची पूर्तता नसलेल्या खताचे उत्पादन व विक्री, खताच्या गोण्यांवर खोट्या किंवा अस्तित्वात नसलेल्या उत्पादकांची नावे, खत नसलेल्या पदार्थाची खत म्हणून विक्री तसेच मागितलेली माहिती न देणे आदी गंभीर बाबी निदर्शनास आल्या आहेत.

# वाहतूकदारांचे ५ मार्चपासून राज्यव्यापी आंदोलन

## ई-चलन प्रणाली अन्यायकारक असल्याची भावना

वृत्तसंस्था । मुंबई

**मोटार वाहन व पोलिस विभाग राबवित असलेली ई–चलन प्रणाली नागरिक व वाहनधारकाच्या दृष्टीने अन्यायकारक आहे. जबरदस्ती दंड वसूल करून जनतेची व वाहनधारकांची नियमबाह्यरितीने लूट करण्यात येत असल्याने राज्यातील वाहतूकदार येत्या ५ मार्चपासून आंदोलन करणार आहेत. या आंदोलनात ट्रक, टेम्पो, खाजगी ट्रॅव्हल्स, ऑटो, टॅक्सी, शालेय बस चालकही सहभागी होणार आहेत.**



यामुळे राज्यातील माल वाहतूकीसह प्रवासी वाहतूक विस्कळीत होण्याची शक्यता आहे.

तसेच शालेय विद्यार्थ्यांनाही फटका बसण्याची चिन्हे आहेत.

केंद्र शासनाने १ ऑक्टोबर २०२० पासून मोटार वाहन कायदा कलम २११ ए व केंद्रीय मोटार वाहन नियम १६४, १६५ व १६७, तसेच (पान २ वर)

# उधना-पुणे स्पेशल ट्रेनला हिरवा कंदील..!

## ●खा.स्मितताई वाघ यांच्या पाठपुराव्याला यश; ताप्ती सेक्शनमधील प्रवाशांना दिलासा

वृत्तसंस्था । मुंबई

**स्मितताई वाघ यांच्या पाठपुराव्याला यशाची चाहूल उधनापुणे स्पेशल ट्रेन प्रस्ताव निर्णायक टप्प्यात; ताप्ती सेक्शनमधील प्रवाशांना मोठा दिलासा**

**धरणगाव । दि. १८ (राजेंद्र वाघ) जळगाव, धुळे, नंदुरबार तसेच पुणे परिसरातील प्रवाशांची अनेक वर्षांपासूनची प्रलंबित मागणी आता पूर्णत्वाच्या उंबरठ्यावर असल्याची माहिती समोर आली आहे.**



उधना- पुणे स्पेशल ट्रेनचा प्रस्ताव निर्णायक टप्प्यात पोहोचल्याने ताप्ती सेक्शनमधील नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. ही प्रस्तावित स्पेशल ट्रेन नंदुरबार–जळगाव–मनमाड या ताप्ती मार्गावरून धावणार आहे. पश्चिम महाराष्ट्र व गुजरातदरम्यान थेट रेल्वे संपर्क प्रस्थापित होणार आहे. त्यामुळे दररोज प्रवास करणाऱ्या हजारो प्रवाशांना मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. खा. स्मितताई वाघ यांनी या प्रस्तावाला प्राधान्य देत प्रशासनाशी औपचारिक संपर्क साधला. तसेच मुख्यालय, पुणे व भुसावळ रेल्वे विभागांशी समन्वय साधून व्यवहार्यता, वेळापत्रक आणि संचालन क्षमतेबाबत सविस्तर चर्चा केली. प्रशासनिक पातळीवर संबंधित विभागांनी सकारात्मक भूमिका घेतल्याचे सूत्रांनी सांगितले. धरणगाव तालुका प्रवासी मंडळानेही सातत्यपूर्ण पाठपुरावा केला. मंडळाचे अध्यक्ष व पश्चिम रेल्वेचे सदस्य महेंद्र कोठारी यांनी उच्च अधिकाऱ्यांसमोर प्रवाशांच्या अडचणी मांडल्या. पश्चिम रेल्वेचे महाप्रबंधक, विभागीय रेल्वे व्यवस्थापक आणि परिचालन विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांशी झालेल्या बैठकीत तांत्रिक व वेळापत्रकासंदर्भातील मुद्द्यांवर सकारात्मक सहमती दर्शविण्यात आल्याचे समजते.

### ट्रेन सुरू झाल्यास संभाव्य फायदे :

- ताप्ती सेक्शनमधील प्रवाशांना थेट सेवा.
- मनमाड, चाळीसगाव, पाचोरा परिसरातील प्रवास सुलभ.
- तिकीट वेटिंग कमी होण्याची शक्यता.
- व्यापार, शिक्षण व रोजगारासाठी सोयीस्कर मार्ग.
- शिर्डीला जाणाऱ्या भाविकांसाठी थेट सुविधा.
- उधना, नवापूर, नंदुरबार, दोंडाईचा, अमळनेर, धरणगाव, जळगाव, पाचोरा, चाळीसगाव, मनमाड, कोपरगाव, अहिल्यानगर, दौंड मार्गे पुणे असा संभाव्य मार्ग चर्चेत आहे.

### मुस्लिम समाजाला दिलेलं ५ टक्के आरक्षण रद्द

वृत्तसंस्था । मुंबई

मुस्लीम समाजाला देण्यात आलेल्या आरक्षणासंदर्भात महत्वाची बातमी समोर आली आहे. मुस्लीम समाजाला देण्यात आलेलं ५ टक्के आरक्षण रद्द करण्यात आलंय.

मुस्लिम समाजासाठी राबवण्यात येणाऱ्या जात प्रमाणपत्र प्रक्रियेला ब्रेक लावण्यात आला आहे. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी सरकारने दिलेल्या आरक्षणानंतर प्रक्रिया सुरू करण्यात आली होती. पण आता राज्य शासनाकडून सुधारित शासन निर्णय प्रकाशित करण्यात आलाय. आरक्षणाचा शासनादेश जारी करण्यात आलं असून, त्यात आरक्षण रद्द करण्यात आल्याची माहिती देण्यात आली आहे.

## संपादकीय

### रेल्वे प्रवाशांची लूट

भारतीय प्रवासी वाहतुकीत रेल्वेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. दररोज लाखो नागरिक देशाच्या कानाकोपऱ्यातून रेल्वेतून प्रवास करत इच्छितस्थळी जातात. सणासुदीचा काळ आणि सुट्ट्यांमध्ये तर रेल्वे प्रवासाला बहर येतो. अशावेळी आरक्षण हा कळीचा मुद्दा असतो. रेल्वे पोर्टलवर प्रवासाच्या काही दिवस अगोदर जागेचे आरक्षण सुरू होते. अशावेळी काही प्रवाशांना आरएसीचा स्लॉट मिळतो. यात किमान बसण्याची हमी मिळते, परंतु त्यापोटी आकारले जाणारे भाडे हे आरक्षित जागेइतके असते. याच व्यवस्थेला संसदीय समितीने आक्षेप घेतला आहे. संसदेत ५ फेब्रुवारी रोजी सादर केलेल्या लोकलेखा समितीच्या अहवालानुसार आरएसी (रिझर्व्हेशन अगेंस्ट कॅन्सलेशन) तिकिटावर प्रवास करणाऱ्या नागरिकांकडून संपूर्णपणे भाडे वसूल करणे तर्कसंगत नसल्याचे म्हटले आहे. प्रामुख्याने चार्ट तयार झाल्यानंतर प्रवाशाला पूर्ण जागा मिळत नाही आणि त्याचवेळी पूर्ण पैसे भरूनही संबंधिताला अन्य प्रवाशांसमवेत प्रवास करावा लागतो. अशा स्थितीत आरएसीवर प्रवास करणाऱ्या प्रवाशाला काही प्रमाणात भाडे परत करावे आणि तशी व्यवस्था आणावी, असे रेल्वे मंत्रालयाला शिफारस करण्यात आली आहे. समितीच्या मते, सध्याची तिकीट व्यवस्था प्रवाशांची आर्थिक गळचेपी करणारी आहे. अशावेळी रेल्वेच्या जबाबदारीबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. एखादा प्रवासी लांब पल्ल्याचा प्रवास करत असेल तर अशावेळी आरएसी श्रेणी त्याला खूपच अडचणीची ठरते. त्यातही प्रवासी ज्येष्ठ, महिला आणि आजारी असेल तर त्याची स्थिती खूपच शोचनिय होते. यावर तिकीट बुक करताना त्याला आरएसी मिळत असेल तर त्याची पूर्ण कल्पना प्रवाशाला असते, असा रेल्वेकडून दिला जाणारा युक्तिवाद संसदीय समितीला अमान्य आहे. समितीच्या मते, एखादा प्रवासी चुकीच्या व्यवस्थेला सहमती देत असेल तर ती न्यायसंगत असेलच असे नाही. काहीवेळा नाईलाज म्हणून तो प्रवासाला तयार होतो. त्यामुळे चार्ट तयार झाल्यानंतर आरएसी श्रेणीत असलेल्या प्रवाशांना काही प्रमाणात भाडे परत करण्याची सुविधा असायला हवी, असे समितीने सुचविले आहे. त्याची अंमलबजावणी तातडीने करावी, असेही रेल्वे मंत्रालयाला सांगितले आहे. उपायांसंदर्भात केलेल्या शिफारशी आणि सूचनांवर कधीपर्यंत कार्यवाही केली जाईल, याची माहिती संसदेला सादर करावी, असेही लोकलेखा समितीने रेल्वे मंत्रालयाला सांगितले आहे. तसेच भविष्यात प्रवाशांना दिलासा देण्यासाठी आणखी कोणते धोरण आखणार आहेत, त्याचीही माहिती द्यावी, असे म्हटले आहे. रेल्वेने समितीच्या शिफारशींना गांभीर्याने पाहिले नाही तर यापुढे आणखी कडक निर्देश दिले जाऊ शकतात, अशी तंबीही दिली आहे. कारण दररोज लाखो प्रवासी आरएसी तिकिटावर प्रवास करतात आणि अनेकदा त्यांना पूर्ण बर्थ देखील मिळत नाही. समितीच्या मते, रेल्वेसारख्या सार्वजनिक सेवेच्या संस्थांनी प्रवाशांच्या हिताची जपवणूक करायला हवी. केवळ महसुलवाढीचे धोरण आखू नये, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. समितीच्या अहवालातील दुसरा मोठा मुद्दा म्हणजे, सुपरफास्टची वास्तविक स्थिती. अर्थात सुपरफास्ट रेल्वेचा अर्थ हा त्याचा वेग आणि भाड्यावर अवलंबून आहे. भारतीय रेल्वेने २००७ रोजी एक धोरण निश्चित केले. एखाद्या रेल्वेचा सरासरी वेग ब्रॉडगेजवर ५५ किलोमीटर प्रती तास असेल आणि मीटर गेजवर ४५ किलोमीटर प्रतितास असेल तर त्यास सुपरफास्ट श्रेणीत ठेवले जाईल.

# जिल्ह्यात दुग्ध उत्पादन वाढीसाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहित करावे

**दुग्ध उत्पादक शेतकऱ्यांच्या बैठकीत जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांचे आवाहन**



**प्रतिनिधी । धुळे**

**जिल्ह्यात दुग्ध उत्पादन वाढविण्यासाठी दुग्ध उत्पादक शेतकऱ्यांना प्रोत्साहित करावे, अशा सूचना जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी दिल्या. जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्ह्यातील दुग्ध उत्पादक शेतकऱ्यांची बैठक आज आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते या बोलत होत्या.**

यावेळी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था मनोज चौधरी, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. गिरीश पाटील, सहायक निबंधक शेखर साळी तसेच सहकारी दुग्ध उत्पादक शेतकरी उपस्थित होते.

**● अल्पदरात विमा योजना राबविण्याबाबत प्रस्ताव**

**दुभत्या जनावरांसाठी नाममात्र अनुदानावर अल्पदरात विमा योजना राबविण्याबाबत प्रस्ताव सादर करावा. दर्जेदार वंशावळीची जनावरे व उच्च प्रतीचे कृत्रिम रेतन सुविधा अल्पदरात उपलब्ध करून द्यावे. दुग्ध उत्पादकांसाठी दूध संकलन केंद्रांची उभारणी करावी. जनावरांसाठी मुबलक वैरण व चारा उपलब्ध व्हावा यासाठी मूरघास निर्मितीला चालना देणे, वैरणीच्या बियाण्यांचा पुरवठा करावा. बँकांच्या माध्यमातून किसान क्रेडीट कार्डद्वारे भागभांडवल उपलब्ध करून देण्यावर भर द्यावा. जिल्ह्यात दुग्ध उत्पादन वाढीसाठी शिबिरांच्या माध्यमातून जनजागृती करावी. महिलांनी दुग्ध व्यवसायात अधिकाधिक सहभाग नोंदविण्यासाठी जनजागृती करावी.**

जिल्हाधिकारी विसपुते पुढे म्हणाल्या की, धुळे जिल्हा दुग्ध उत्पादनात आघाडीवर होता. तो पुन्हा एकदा आघाडीवर नेण्यासाठी विविध उपाययोजना कराव्यात. तसे झाल्यास शेतकऱ्यांच्या उत्पादन वाढीसाठी मदत होईल.

जिल्ह्यात दुग्ध उत्पादन वाढीसाठी शिबिरांच्या माध्यमातून जनजागृती करावी. महिलांनी दुग्ध व्यवसायात अधिकाधिक सहभाग नोंदविण्यासाठी जनजागृती करावी, असेही जिल्हाधिकारी विसपुते यांनी सांगितले.

# शिवाजी महाराज जयंतीनिमित्त सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी

## जिल्हाधिकारी डॉ. मिताली सेठी यांची माहिती

**प्रतिनिधी । जळगाव**

**महाराष्ट्र शासनाचा सांस्कृतिक कार्य विभाग आणि नंदुरबार जिल्हा प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त १८ व १९ फेब्रुवारी रोजी सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३९६ व्या जयंतीनिमित्त आयोजित या महोत्सवात महाराष्ट्राची समृद्ध लोकसंस्कृती आणि शिवरायांच्या शौर्याचा इतिहास उलगडणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी डॉ. मिताली सेठी यांनी दिली.**

या सोहळ्याचे उद्घाटन मान्यवरांच्या उपस्थितीत छत्रपती शिवाजी महाराज नाट्यमंदिर नंदुरबार येथे संपन्न होईल. या महोत्सवाचे मुख्य आकर्षण म्हणजे स्थानिक युवा कलाकार गौरव माळी आणि त्यांचे सहकारी यांनी साकारलेली ३-२ रांगोळी असणार आहे. या रांगोळीच्या माध्यमातून शिवरायांच्या जीवनातील विविध ऐतिहासिक प्रसंग रेखाटले जाणार आहेत. तसेच पोवाडे आणि शिव स्वरांजली शिवरायांच्या कार्यकर्तृत्वावर आधारित अनेक दर्जेदार कार्यक्रमांची मेजवानी रसिकांना मिळणार आहे. १९ फेब्रुवारी रोजी राज्य सांस्कृतिक पुरस्कार प्राप्त सुप्रसिद्ध लोकशाहीर शिवाजीराव पाटील यांचा शाहिरी पोवाड्यांचा कार्यक्रम होईल. ओमकार संगीत साधना विद्यालयाचे हेमंत पाटील आणि त्यांचे सहकारी शिवरायांची संगीतमय कथा सादर करतील. महाराजांच्या पराक्रमावर आधारित विविध गीते आणि पोवाडे या महोत्सवात सादर केले जाणार आहेत.

युवा पिढीमध्ये ऐतिहासिक गौरव आणि देशभक्तीची भावना जागृत करण्यासाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये प्रामुख्याने भव्य रांगोळी आणि चित्रकला स्पर्धा, समूह नृत्य स्पर्धा, ऐतिहासिक किल्ल्यांची प्रतिकृती आणि किल्ले बनवा स्पर्धा यांचा समावेश आहे.

या स्पर्धांच्या माध्यमातून शालेय विद्यार्थी आणि स्थानिक कलाकारांना आपले कौशल्य दाखवण्याची संधी मिळणार असून, शिवरायांचे विचार घराघरात पोहोचवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. दोन दिवसीय सांस्कृतिक कार्यक्रमाला जिल्ह्यातील सर्व शिवप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. मिताली सेठी यांनी केले आहे.

# मेळाव्यात घोड्याची २ लाख ७१ हजार किंमत

**प्रतिनिधी । शिरपूर**

**शिरपूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात खंडेराव महाराज मेळावा भरविण्यात आला होता. या वर्षीचा २ लाख ७१ हजार रुपये सर्वोच्च किंमत असलेला घोडा ठरला.**

या मेळाव्यात विविध जिल्हातून घोडे खरेदीदार घोडे खरेदी करण्यासाठी आले होते. यामध्ये पंजाब, सिंध, मारवाडी, काठेवाडी असे जातीवंत घोडे विक्रीस आले होते. तसेच चांगल्या प्रतिचे बैल व म्हशी देखिल विक्रीस आल्या होत्या. परराज्यातून विक्रीस आलेल्या घोड्यापैकी मोहंमद रशिद अब्दुल खालीद रा. रिच्छा (उत्तरप्रदेश) यांनी विक्रीस आणलेला उमदा घोडा या वर्षीचा सर्वोच्च किंमत असलेला घोडा ठरला. सदर घोडा २ लाख ७१ हजार या किंमतीस ऋषीकिरण रविकिरण चव्हाण (दादू चव्हाण, बग्गीवाले) रा. शिरपूर यांनी खरेदी केला. या मेळाव्यात एकूण १,२६४ जनावरांची आवक होवून ७७७ जनावरे विक्री झाली. त्यातून एकूण १ कोटी ६७ लाख ६१ हजारांची उलाढाल झाली आहे. शिरपूर बाजार समितीत गुरांच्या मेळाव्यात मोठ्या प्रमाणात घोडे व बैल विक्रीस आले होते.

# वरखेडी रोडवर अतिक्रमण निर्मूलन पथकाला धक्काबुक्की

**प्रतिनिधी । धुळे**

**शहरातील वडजाई रोड परिसरात अनधिकृत अतिक्रमण काढण्यासाठी गेलेल्या महापालिकेच्या पथकाला दमदाटी करून मोहिमेत अडथळा आणला. धुडगूस घालणाऱ्यांकडून महापालिकेचे अतिक्रमण निर्मूलन पथकाचे प्रमुख प्रसाद जाधव यांना धक्काबुक्की करण्यात आल्याची गंभीर घटना घडली. पोलिसांनी तत्काळ हस्तक्षेप करून संबंधितांना ताब्यात घेतले.**



शहरातील वडजाई रोड, भोईवाडाजवळील हाजीनगर परिसरात अनधिकृत अतिक्रमण हटवण्यासाठी महापालिकेच्या पथकाने सकाळपासून मोहीम सुरू केली होती. पोलीस बंदोबस्तात सुरू असलेल्या या कारवाईदरम्यान काही व्यक्तींनी अडथळा आणण्याचा प्रयत्न केला. काही टवाळखोरांनी अतिक्रमण हटवण्यासाठी आणलेल्या शासकीय बुलडोझरच्या वायर काढून कारवाई थांबवण्याचा प्रयत्न केला. तसेच अतिक्रमण निर्मूलन विभागाचे प्रमुख प्रसाद जाधव यांच्याशी दादागिरी करत त्यांना धक्काबुक्की करण्यात आल्याचा प्रकार घडला. परिसरात तणाव निर्माण झाल्याने चाळीसगावरोड पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत जमाव पांगवला. धुडगूस घालणाऱ्या काहींना ताब्यात घेऊन पोलीस ठाण्यात नेण्यात आले. त्यानंतर पोलिसांच्या कडक बंदोबस्तात अतिक्रमण निर्मूलन मोहीम पुन्हा सुरू करण्यात आली. शासकीय कामात अडथळा आणणे तसेच अधिकारी व कर्मचाऱ्यांशी धक्काबुक्की करून दहशत माजवण्याप्रकरणी संबंधितांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

# अमळनेर येथे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

**प्रतिनिधी । अमळनेर**

श्रम साफल्य एज्युकेशन सोसायटी अमळनेर संचलित समाजकार्य महाविद्यालय व औद्योगिक संस्था येथे वार्षिक स्नेह संमेलन उत्साहात संपन्न झाले. उद्घाटन समारंभ अध्यक्ष सुभाष भांडारकर यांनी भूषविले. प्रमुख अतिथी म्हणून सिनेट सदस्य डॉ. धीरज वैष्णव, आयआयटी मुंबई येथील डॉ. राहुल देशमुख, दिनेश नाईक, राष्ट्र विकास संस्था सचिव तुषार पाटील, आधार संस्था प्रतिनिधी अश्विनी सूर्यवंशी, आनंद पगारे, मुरलीधर बिरारी, मोहिनी धनगर, दिप्ती गायकवाड, ज्ञानेश्वरी पाटील, आप्पासाहेब सूर्यवंशी, पालक, संस्था प्रतिनिधी यांची उपस्थिती होती. संस्थेचे अध्यक्ष अभिजीत भांडारकर, संचालक विवेकानंद भांडारकर, डॉ. महेश पाटील, अमोल राजपूत, ओम भांडारकर, प्राचार्य डॉ.पी.एस. पाटील, विनोद वैद्य, विभाग प्रमुख डॉ. जगदीश सोनवणे, स्नेहसंमेलन प्रमुख प्रा. धनराज ढगे, डॉ. अस्मिता सर्वेया यांच्या उपस्थितीत उद्घाटन समारंभ पार पडला.

# सांस्कृतिक परंपरेचे दर्शन घडविणार तोरणमाळ महोत्सव

**प्रतिनिधी । शहादा**

**सातपुडा पर्वतरांगांच्या कुशीत वसलेले निसर्गरम्य तोरणमाळ हे राज्यातील एक महत्त्वाचे पर्यटनस्थळ म्हणून ओळखले जाते. या पर्यटनस्थळाच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्यासाठी तसेच आदिवासी समाजाच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेचे दर्शन घडविण्यासाठी २० ते २२ फेब्रुवारी या कालावधीत तीनदिवसीय तोरणमाळ महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.**

जिल्हाधिकारी डॉ.मिताली सेठी यांनी यासंदर्भात सविस्तर आदेश निर्गमित करून विविध विभागांना स्पष्ट जबाबदाऱ्या सोपविल्या आहेत. महोत्सव काळात मोठ्या प्रमाणावर पर्यटक व नागरिक उपस्थित राहण्याची शक्यता लक्षात घेता प्रशासनाने नियोजनबद्ध पद्धतीने सर्व यंत्रणा सज्ज ठेवण्याचे निर्देश दिले आहेत. जिल्हा पोलिस अधीक्षक कार्यालयास कार्यक्रमस्थळी कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे, गर्दी नियंत्रण, तसेच वाहतुकीचे सुयोग्य नियमन करण्याची जबाबदारी देण्यात आली आहे. कार्यक्रमादरम्यान पर्यटकांना कोणताही अडथळा येऊ नये, यासाठी आवश्यक तेवढा पोलिस बंदोबस्त तैनात केला जाणार आहे. तोरणमाळ हे वनक्षेत्रात असल्याने वनविभागास पर्यटकांची सुरक्षितता, नैसर्गिक पर्यावरणाचे संवर्धन, तसेच कार्यक्रमासाठी आवश्यक तात्पुरत्या परवानग्या देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. वनक्षेत्रातील कोणतीही बाधा टाळण्यासाठी विशेष दक्षता घेतली जाणार आहे. स्थानिक कलाकारांना व्यासपीठ महोत्सवादरम्यान, सहाय्यक जिल्हाधिकारी तथा तळोदा आदिवासी विकास प्रकल्पाचे प्रकल्प अधिकारी यांच्याकडे संपूर्ण सांस्कृतिक कार्यक्रमांचे नियोजन, समन्वय व अंमलबजावणीची जबाबदारी देण्यात आली आहे. स्थानिक कलाकारांना व्यासपीठ उपलब्ध करून देत आदिवासी नृत्य, लोककला, हस्तकला व पारंपरिक परंपरांचा उत्सव साजरा केला जाणार आहे. स्वच्छतेसाठी विशेष पथके महोत्सवादरम्यान स्वच्छतेसाठी विशेष पथके तैनात केली जाणार आहे. पिण्याच्या पाण्याची उपलब्धता आणि स्थानिक परिवहन यंत्रणेस पर्यटकांच्या सोयीसाठी अतिरिक्त बसफेऱ्या व आवश्यक वाहतूक व्यवस्था करण्याचे आदेश देण्यात आले.

## शिवसेना उबाठातर्फे शिवजयंती उत्सव

**धुळे ।** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने दि. १९ फेब्रुवारी रोजी शिवतीर्थ संतोषी माता चौकात शिवजयंती उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

यंदाच्या वर्षी आकर्षक देखावा, छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन करण्यासाठी येणाऱ्या नागरिकांसाठी स्टेज, आदिवासी नृत्य, उज्जैन व इंदूर येथील कलाकारांचे भगवान महादेव यांचे अघोरी साधु नृत्य आविष्कार, काठी लाठी, तलवार बाजी, बारा पावली नृत्य, ढोलताशा यांच्या गजरात शिवजयंती साजरी होणार आहे.

## पान १ वरुन

**वाहतूकदारांचे ५ मार्चपासून.....**

२०२० पासून १६७ ए अंमलात आणला आहे. यामधील तरतुदीनुसार ई-चलन जारी करण्यासाठी अनुसरावयाच्या पद्धतीची पोलिस विभाग व परिवहन विभाग ई-चलन देताना अंमलबजावणी करीत नसल्याचे निदर्शनास येत असल्याचा आरोप वाहतूक दारानी केला आहे.

ई-चलन देताना प्रामुख्याने वापरण्यात येणारी उपकरणे मान्यताप्राप्त नाहीत. ई-चलन दिल्यावर ताबडतोब संदेश पाठवला जात नाही. ई-चलन देण्यासाठी अधिकाऱ्यांना प्राधिकृत करण्यात आलेले नाही. ई-चलनाची पावती मान्यता प्राप्त नाही. ई-चलनाच्या उपकरणाचे कॅलिब्रेशन होत नाही. ई-चलन देताना पुरावा कायद्यानुसार आवश्यक पुरावे नसताना दंड वसुली करण्यात येते. चलनासोबत जोडण्यात आलेले गुन्ह्याबाबतचे फोटो अस्पष्ट असतानाही दंड वसुली करण्यात येते. वाहनधारकांना न्यायालयात प्रकरण चालविण्याची संधी देण्यात येत नाही. जनतेचा व वाहनधारकांचा संरक्षणाचा हक्क हिरावून घेतला जातो, प्रकरणे तीन महीने व सहा महिन्यांच्या आत न्यायालयात दाखल केली जात नाहीत. या गुन्ह्यांसाठी पुरेशी न्यायालये उपलब्ध नाहीत. केंद्र शासनाने जानेवारी २०२६ मध्ये सुधारणा करून ४५ दिवसापर्यंत दंड न भरल्यास वाहन जप्त करण्याची तरतूद केली आहे. यामध्ये जनतेला न्यायालयात प्रकरण चालविण्याचा हक्क पूर्णपणे काढून घेतला आहे. ई-चलन पद्धत जनता व वाहनधारकांवर जबरदस्तीने लादून खोटे गुन्हे दाखल करून जबरदस्तीने दंड वसूल करण्याचा दबाव आहे.

**चीनच्या रोबोडॉगवरील.....**

दिल्लीतील एआय समिटमध्ये गलगोटिया विद्यापीठाने ओरियन रोबोडॉग प्रदर्शित केला. विद्यापीठाने ३५० कोटी एआय कार्यक्रमाअंतर्गत त्याची निर्मिती केल्याचे विद्यापीठाच्या प्राध्यापिका नेहा सिंग एका व्हिडीओत सांगत आहेत. हा व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाला. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी देखील हा व्हिडीओ शेअर केला होता. दरम्यान, हा रोबोडॉग चायनीज असल्याचे समोर आले. यानंतर विद्यापीठावर सोशल मीडियातून जोरदार टीका झाली. विरोधकांकडून देखील सरकारवर सडकून टीका केली.

**कोपरगावमध्ये ६.२४ लाखांचे.....**

संवत्सर शिवारात मंगळवारी रात्री पोहोचले. संशयित मालमोटार (एम एच २० डी ई ०९९९ ) थांबवत पथकाने चालकाकडे चौकशी केली असता मालमोटारीत रासायनिक खत असल्याचे त्याने सांगितले. मात्र खताच्या खरेदी-विक्री संदर्भातील कोणतीही कागदपत्रे त्याच्याकडे आढळली नाहीत. यानंतर मालमोटारीचा पंचनामा करून एकूण २३.८५ मेट्रिक टन संशयित रासायनिक खतांच्या ४ हजार ७७ बनावट खताच्या गोण्या जप्त करण्यात आल्या. त्याची अंदाजे किंमत ६ लाख २४ हजार रुपये आहे. ही कारवाई गणेश बिरदवडे (गुण नियंत्रक निरीक्षक, कृषी विभाग, कोपरगाव), मनोज सोनवणे (तालुका कृषी अधिकारी, कोपरगाव), राहुल ढगे (जिल्हा गुणनियंत्रण निरीक्षक, अहिल्यानगर) तसेच पोलीस उपनिरीक्षक संदीप सोन्ने व दीपक रोठे यांच्या संयुक्त पथकाने केली.

# अक्कलकुव्यात १५ गावांसाठी विकास प्रकल्पाचा शुभारंभ

**एचडीएफसी बँक परिवर्तन-टाटा ट्रस्ट सहयोगी सीनी संस्थेचा उपक्रम**

**प्रतिनिधी । नंदुरबार**

**अक्कलकुवा तालुक्यातील दुर्गम मोलगी परिसरातील १५ गावांच्या सर्वांगीण विकासासाठी एचडीएफसी बँक परिवर्तन (सीएसआर) आणि टाटा ट्रस्ट सहयोगी सीनी संस्थेच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या उपजीविका विकास प्रकल्पाचा शुभारंभ भगदरी येथील सांस्कृतिक भवनात उत्साहात पार पडला.**



या प्रकल्पांतर्गत भगदरी, ओलपाडा, पांढरामाती, उमटी, वेहेगी, पिंपळखुटा आदी गावांचा समावेश असून जलसंधारण, कृषी सुधारणा आणि पूरक व्यवसायांच्या माध्यमातून ग्रामस्थांचे उत्पन्न वाढविण्यावर भर दिला जाणार आहे. विशेष म्हणजे महिला सक्षमीकरणाला केंद्रस्थानी ठेवत प्रत्येक गावात गाव उपजीविका समिती स्थापन केली जाणार आहे. या समित्यांच्या माध्यमातून सुधारित शेती पद्धती, भाजीपाला लागवड, उत्पादनवाढीचे उपक्रम तसेच बाजारपेठेपर्यंत थेट जोडणी यावर काम केले जाणार आहे. या उद्घाटन प्रसंगी प्रा.केदारनाथ कवडीवाले (अध्यक्ष, कृषी विज्ञान केंद्र नंदुरबार), रवी मोरे (डीडीएम, नाबार्ड), योगेश पगारे (व्यवस्थापक, एचडीएफसी परिवर्तन सीएसआर), विजयसिंग पाटील (रिजनल मॅनेजर, सीनी संस्था), डॉ. हर्षवर्धन पाटील (पशुधन अधिकारी) यांच्यासह स्थानिक लोकप्रतिनिधी, पंचायत समिती सदस्य, सरपंच व ग्रामस्थ उपस्थित होते. सूत्रसंचालन संजय बागुल यांनी केले. आभार नीलम मुळे यांनी मानले.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक - सागर काशिनाथ ओतारी (मोबा.- ९९७००५३०६६) व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई-१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
✲ कार्यकारी संपादक - किशोर शंकर शिंपी (✲ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७-२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

# आता सिमेंट कॉंक्रिट रस्त्यांच्या उभारणीस मिळणार गती

## मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या माध्यमातून रस्त्यांचे भाग्य उजळणार

प्रतिनिधी । जळगाव

**ग्रामीण भागातील दळणवळण व्यवस्था अधिक मजबूत, टिकाऊ करण्याच्या उद्देशाने जळगाव जिल्ह्यात मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या माध्यमातून आता सिमेंट कॉंक्रिट रस्त्यांच्या उभारणीस गती देण्यात आली आहे. राष्ट्रीय महामार्गांच्या धर्तीवर ग्रामीण रस्ते विकसित करण्याचा उद्देश प्रत्यक्षात उतरू लागला असून, योजनेच्या दुसऱ्या टप्प्यात मंजूर झालेल्या रस्त्यांचे पूर्णपणे कॉंक्रीटीकरण करण्यात येत आहे.**



यापूर्वी मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत गावातून जाणाऱ्या रस्त्यांच्या काही भागाचेच कॉंक्रीटीकरण केले जात होते, तर उर्वरित भाग डांबरी ठेवण्यात येत होता. त्यामुळे पावसाळ्यात डांबरी भागात खड्डे पडणे, रस्ता खराब होणे आणि वाहतुकीस अडथळे निर्माण होणे, या समस्या वारंवार उद्भवत होत्या. मात्र, आता संपूर्ण रस्ता सिमेंट कॉंक्रिटचा केल्याने टिकाऊपणा वाढणार असून, दीर्घकाळ दुरुस्तीची गरज भासणार नाही. ग्रामीण भागात शेती हा प्रमुख व्यवसाय आहे. शेतमाल बाजारपेठेत नेण्यासाठी दर्जेदार रस्ते आवश्यक असतात. नवीन कॉंक्रिट रस्त्यांमुळे शेतकऱ्यांना मालाची वाहतूक अधिक वेगाने आणि सुरक्षितपणे करता येणार आहे. विशेषतः पावसाळ्यात चिखल, पाणी साचणे किंवा रस्त्यांची दुर्दशा यामुळे होणारे नुकसान टळणार आहे. विद्यार्थी, व्यापारी, रुग्णवाहिका सेवा तसेच आपत्कालीन सेवा यांनाही या रस्त्यांचा मोठा फायदा होणार आहे.

**ग्राम विकासाला मिळेल गती**

गाव ते तालुका आणि जिल्हा मुख्यालय यादरम्यानचा प्रवास अधिक सोयीस्कर आणि वेळेत पूर्ण होईल. ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा सक्षम करण्यासाठी केंद्र सरकारच्या पंतप्रधान ग्रामसडक योजनेच्या धर्तीवर राज्यात मुख्यमंत्री ग्रामसडक योजना प्रभावीपणे राबवली जात आहे. गेल्या काही वर्षांत या योजनेमुळे जळगाव जिल्ह्यात शेकडो किलोमीटर रस्त्यांची निर्मिती झाली आहे. अनेक दुर्गम गावांना प्रथमच दर्जेदार रस्त्यांची सुविधा उपलब्ध झाली आहे. ममुराबाद ते आव्हाणे मार्गाच्या कॉंक्रीटीकरणाला मंजुरी मिळाल्यामुळे ग्रामस्थांमध्ये समाधान व्यक्त करण्यात येत आहे. दीर्घकाळ टिकणारा आणि मजबूत रस्ता तयार झाल्यास आमचा प्रवास सुलभ होईल, अशी प्रतिक्रिया काही ग्रामस्थांनी दिली आहे.

वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी साकारलेल्या बाह्यवळण महामार्गामुळे जळगाव शहराच्या उत्तरेला असलेल्या लहान व मोठ्या जोडरस्त्यांना विशेष महत्व प्राप्त झाले आहे. त्याचा एक भाग असणारा ममुराबाद ते आव्हाणे या सुमारे ४.१० किलोमीटर लांबीच्या रस्त्याचे कॉंक्रीटीकरण आता करण्यात येणार आहे. या कामासाठी अंदाजे पाच कोटी रुपयांच्या निधीस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

# रस्ता सुरक्षा अभियानातून शहरातील ३५ शाळांमध्ये राबविला उपक्रम

प्रतिनिधी । जळगाव

**रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत शहरातील ३५ शाळांमध्ये विविध उपक्रमातून प्रबोधन करण्यात आले.**




जळगाव शहरात गेल्या महिनाभरापासून रस्ता सुरक्षा अभियान राबविण्यात येत होते. त्यात जळगाव शहर वाहतूक शाखेतर्फे विविध उपक्रम राबविण्यात आले. त्यात शहरातील ३५ शाळांमध्ये रस्ता वाहतुक सुरक्षा या विषयावर चित्रकला स्पर्धा, निबंध स्पर्धा घेण्यात आल्या. त्याचप्रमाणे ईव्हीएस बस येथे कार्यशाळा व विविध कंपन्यामध्ये वाहतूक सुरक्षेसंबंधी रस्ता सुरक्षासंदर्भात प्रबोधन केले. तसेच विविध चौका चौकांमध्ये व वर्दळीच्या ठिकाणी बस स्टॅन्ड, रेल्वे स्टेशन, कॉलेज, शाळे बाहेर शहर वाहतूक शाखेमार्फत वाहतूक नियमांची माहिती दिली. त्या अनुषंगाने शहर वाहतूक शाखा जळगाव येथे दि.१७ रोजी रस्ता सुरक्षा अभियान -२०२६ चे बक्षीस वितरण करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे महापौर दीपमाला काळे, उपमहापौर मनोज चौधरी तसेच प्रमुख अतिथी जिल्हा पोलीस अधीक्षक महेश्वर रेडडी, अपर पोलीस अधीक्षक अशोक नखाते, उपविभागीय पोलीस अधिकारी नितीन गनापुरे , पोलीस उपअधिक्षक (गृह) अरुण अव्हाड आदी उपस्थित होते. शहरातील एकूण ३५ शाळांनी सहभाग घेतल्याने त्या शाळांमधील निबंध स्पर्धा व चित्रकला स्पर्धेत बक्षीस पात्र असलेल्या एकूण १७३ विवद्यार्थी व ३० शिक्षकांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आले.या कार्यक्रमाची शोभा वाढविण्यासाठी श्रीराम माध्यमिक स्कुलच्या विद्यार्थ्यांनी पथनाटय सादर केले. तसेच शिक्षण मंदिर संस्था, अभिनव पाठशाळा व एम.जे.कॉलेजच्या एनसीसीच्या विद्यार्थ्यांनी देखील पथनाटय सादर केल्याने त्यांना देखील बक्षीस देवून गौरविण्यात आले.

## थोडक्यात

### शासकीय आयुर्वेद महाविद्यालयात पगारकोंडी

**जळगाव ।** येथील शासकीय आयुर्वेद महाविद्यालय आणि रुग्णालयातील कंत्राटी कर्मचाऱ्यांवर तीन महिन्यांपासून उपासमारीची वेळ आली आहे. स्मार्ट सर्व्हिसेस, पुणे या कंपनीने कर्मचाऱ्यांचे वेतन रोखल्याने संताप व्यक्त होत असून, आता या प्रकरणात शिवसेनेने (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आक्रमक उडी घेतली आहे. दोन दिवसांत पगार न झाल्यास शिवसेना स्टाईलने धडा शिकवण्याचा इशारा जिल्हा संघटक गजानन मालपुरे यांनी दिला. रुग्णालयातील वर्ग ३ (लिपिक) आणि वर्ग ४ च्या हजारो कर्मचाऱ्यांचे मानधन गेल्या २ ते ३ महिन्यांपासून रखडले आहे. शासनाकडून निधी प्राप्त झाला नसल्याचे कारण कंपनीकडून दिले जात आहे.मात्र,मंत्र्यांशी संबंधित कंपनी असल्याने प्रशासन दुर्लक्ष करत असल्याचा आरोप होत आहे.

### शिवाजी महाराजांच्या भव्य प्रतिकृतीचे अनावरण

**जळगाव ।** महाराष्ट्र राज्याचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जन्मोत्सवानिमित्त (शिवजयंती) शहरात उत्साहाचे वातावरण असून, यानिमित्ताने एका विशेष सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. येत्या १९ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ७ वाजता प्रभाग ७ येथे शिवकॉलनी स्टॉप परिसरात महाराजांच्या एका भव्य-दिव्य प्रतिकृतीचे दर्शन सोहळा पार पडणार आहे. याप्रसंगी आ. राजूमामा भोळे, महापौर दीपमाला काळे, नगरसेवक विशाल भोळे, नगरसेविका अंकिता पाटील, नगरसेवक चंद्रशेखर अत्तरदे उपस्थित राहतील. या कार्यक्रमात महाराजांच्या आकर्षक प्रतिकृतीचे पूजन केले जाणार आहे. या ऐतिहासिक सोहळ्याला उपस्थिती द्यावी,असे आवाहन आयोजक पंकज पाटील तथा शिवनेरी ग्रुप यांच्या वतीने करण्यात आले आहे.

### गुरु तेग बहादुर यांचा शहिदी समागम कार्यक्रम

**जळगाव ।** गुरु तेग बहादुर यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.नवी मुंबई येथील खारघर येथे २८ फेब्रुवारी व १ मार्च रोजी महिंद दी चादर श्रीगुरु तेग बहादूर साहिब जी यांचा ३५० व्या शहिदी समागम कार्यक्रम होत आहे. या कार्यक्रमाची विविध उपक्रमांच्या माध्यमातून व्यापक प्रचार व प्रसिध्दी करावी, तसेच जिल्ह्यातील जास्तीत-जास्त नागरिकांनी या कार्यक्रमात आपला सहभाग नोंदवावा, असे आवाहन डॉ.श्रीमंत हारकर यांनी केले.

# शिवजयंती उत्सवानिमित्त आज सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल

प्रतिनिधी । जळगाव

**जळगाव जिल्हा प्रशासन व सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त दि. १८ ते २० फेब्रुवारी या कालावधीत जिल्हास्तरीय भव्य शिवजयंती उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. शिवजयंती सोहळ्यानिमित्त पोवाडा, मिरवणूक व सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल राहणार आहे.**

सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीतर्फे निवडलेल्या उत्कृष्ट चित्रांचे प्रदर्शन दि. १९ फेब्रुवारी रोजी भरविण्यात येणार आहे. दि. १९ फेब्रुवारी रोजी सकाळी ८ वाजता छत्रपती शिवाजी महाराजा स्टेडिअमपासून ते शिवाजी पुतळयापर्यंत मिरवणूक काढण्यात येणार असून विद्यार्थी, एनसीसी विद्यार्थी, शिवप्रेमी, नागरिक मोठ्या संख्येने यात सहभागी होणार आहेत. सहभागींसाठी चहा-नाश्ता व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

### मानवतेची सेवा करण्याचा संकल्प

शिवजयंतीदिनी रक्ताच्या रूपाने मानवतेची सेवा करण्याचा संकल्प महाविद्यालयाने केला आहे. या शिबिराचा उद्देश केवळ रक्तदानापुरता मर्यादित नसून, तरुणांमध्ये एड्स या आजाराबाबत जागरूकता निर्माण करणे, त्याचे दुष्परिणाम व प्रतिबंधात्मक उपायांची माहिती देणे हा देखील आहे. या शिबिराचे उद्घाटन महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. नागनाथ गंगासागरे यांच्या अध्यक्षतेखाली होणार असून, कार्यक्रमाचे नियोजन रेड रिबन क्लबचे समन्वयक तथा रचना शारीर विभागाचे सहाय्यक प्रा. डॉ. सचिन नरवाडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे. सदर शिबिर १९ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ ते दुपारी ३ वाजेपर्यंत अंतर रुग्ण कक्ष, शल्य तंत्र विभाग, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय, जळगाव येथे होणार आहे. महाविद्यालय प्रशासनाने जास्तीत जास्त तरुण, विद्यार्थी व नागरिकांनी सहभागी होऊन रक्तदान करा, जीवन वाचवा या कार्यात आपला सहभाग नोंदवावा, असे आवाहन केले आहे

तसेच लोकप्रतिनिधी, अधिकारी व मान्यवरांना या कार्यक्रमासाठी निमंत्रित करण्यात आले आहे. तर संध्याकाळी ५ ते ८ या वेळेत सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात येणार आहेत. दि. २० फेब्रुवारी रोजी सकाळी ७ ते १० या वेळेत शौर्यगाथांवर आधारित पोवाडा कार्यक्रम होणार असून संध्याकाळी ७ वाजता छत्रपती संभाजीराजे नाट्यगृह येथे प्रसिद्ध शाहीर रामानंद उगले यांचा शाहिरी शिवदर्शन हा विशेष पोवाडे व लोकगीतांचा कार्यक्रम सादर होणार आहे. या कार्यक्रमामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्यगाथा, स्वराज्य स्थापनेचा इतिहास आणि प्रेरणादायी प्रसंग शाहिरी शैलीतून सादर करण्यात येणार आहेत. शिवजयंती उत्सव शांततेत व उत्साहात पार पाडण्यासाठी सर्व विभागांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या आहे.

# पुस्तकी शिक्षणासोबत कलागुणांची जोड हवी : डॉ.सोनवणे

प्रतिनिधी । धरणगाव

**विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकी शिक्षणापुरते मर्यादित न राहता कला, क्रीडा, संस्कृती आणि साहित्य या क्षेत्रांतील गुणांची जोपासना करावी. व्यक्तीच्या अंगी असलेल्या कलागुणांमुळेच त्याची खरी ओळख निर्माण होते, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. संजीवकुमार सोनवणे यांनी गुड शेफर्ड इंग्लिश मिडीयम स्कूल येथे आयोजित वार्षिक बक्षीस वितरण समारंभात प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते.**




समारंभाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्या श्रीमती चैताली रावतोळे होत्या. मंचावर पी.आर. हायस्कूलचे मुख्याध्यापक मेजर डी. एस. पाटील, व्यवस्थापक जगन गावीत तसेच मुख्याध्यापिका भारती तिवारी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. प्राचार्या रावतोळे यांनी शाळेचा वार्षिक अहवाल सादर करत वर्षभरातील शैक्षणिक, क्रीडा व सांस्कृतिक उपक्रमांचा आढावा घेतला. विविध स्पर्धांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या तसेच जिल्हा व राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांमध्ये सहभाग नोंदवणाऱ्या दोनशेहून अधिक विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. सूत्रसंचालन नाजुका भदाणे, गायत्री सोनवणे, हर्षाली पुरभे, माधुरी पाटील व ग्रिष्मा पाटील यांनी केले. क्रीडा शिक्षक ललित ढोके यांच्यासह शाळेतील शिक्षक व कर्मचाऱ्यांनी कार्यक्रमासाठी विशेष परिश्रम घेतले.

# सामान्य कलाकारांना मिळाले मनो-मित्रचे हक्काचे व्यासपीठ

प्रतिनिधी । धरणगाव

दैनंदिन जीवनात व्यासपीठ मिळवण्यासाठी धडपडणाऱ्या कलाकारांना मनो-मित्रने खऱ्या अर्थाने एक हक्काचा मंच उपलब्ध करून दिला. या आगळ्यावेगळ्या संकल्पनेचे आणि सादरीकरणाचे उपस्थित प्रेक्षकांनी टाळ्यांच्या कडकडाटात कौतुक केले. कार्यक्रमाचे मुख्य अतिथी म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. देशमुख उपस्थित होते. याप्रसंगी मनो-मित्रचे संस्थापक डॉ. राहुल येवले, ऑपरेटिंग डायरेक्टर डॉ. पल्लवी येवले यांची प्रमुख उपस्थिती होती.सूत्रसंचालन डॉ. श्रद्धा व्यास आणि शिवानी खोडपे यांनी केले.




# सराईत दुचाकी चोरटा ताब्यात

प्रतिनिधी । जळगाव

**शहरातील कोर्ट आवारातून दि.३ फेब्रुवारी रोजी हिरोहोंडा कंपनीची एच.एफ. डिलक्स (एमएच-३९, टि- ६१०२) गाडी चोरीप्रकरणी भुसावळ पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतले आहे.**

या संदर्भात ॲड. रोकडे यांच्या तक्रारीवरून भुसावळ शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला होता. दरम्यान, उपविभागीय पोलीस अधिकारी केदार बारबोले, गुन्हे शाखेचे निरीक्षक राहुल गायकवाड, भुसावळ शहर पोलीस ठाण्याचे पो.नि. उध्दव डमाळे यांनी तपास पथक तयार केले. जळगावच्या स्थानिक गुन्हे शाखा आणि भुसावळ पोलिसांच्या समांतर तपासानंतर गोपनीय माहितीच्या आधारे संशयित मुक्ताईनगर येथील किरण उर्फ करण शालीग्राम पाटील यास चोरीच्या दुचाकीसह पोलिसांनी ताब्यात घेतले. अटकेदरम्यान संशयिताने सुरत (गुजरात) येथील पोलिस ठाण्यात दाखल असलेली होंडा शाईन (जीजे ०५, एनए ६१८०) चोरी केल्याचीही कबुली दिली. हा संशयित सतत दुचाकी चोरी करणारा असून यापूर्वी मलकापूर पोलीस ठाणे व भुसावळ बाजारपेठ पोलीस ठाण्यातही त्याच्याविरोधात गुन्हे दाखल आहेत. ही कारवाई पो.कॉ.उमाकांत पाटील, प्रशांत परदेशी, राहुल वानखेडे, राहुल भंडारे, राहुल भोई, पो.कॉ. नितीन चौधरी यांनी करुन २ प्रमुख दुचाकी चोरीचे गुन्हे उघडकीस आणले आहेत.

# धरणगाव पं.स.कार्यालयात लिपिक संवर्गाचे कामबंद आंदोलन

प्रतिनिधी । जळगाव

**शासकीय विभागातील लिपिक संवर्गाच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी धरणगाव येथील पंचायत समिती कर्मचाऱ्यांनी पं.स.कार्यालयात कामबंद आंदोलन पुकारले आहे. दि. १६ फेब्रुवारी ते २३ फेब्रुवारी या कालावधीत हे आंदोलन करण्यात येत असून, चौथ्या वेतन आयोगापासून वेतनश्रेणीत राहिलेली तफावत दूर करून सुधारीत वेतनश्रेणी लागू करावी, अशी प्रमुख मागणी यावेळी करण्यात आली.**



शासकीय, निमशासकीय अधिकारी व कर्मचारी संघटनेच्या वतीने आयोजित या आंदोलनात पंचायत समिती कार्यालयातील लिपिक व कर्मचारी सहभागी झाले आहेत. कर्मचाऱ्यांनी प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी कामबंद ठेवत आपल्या मागण्यांचे निवेदन संबंधित अधिकाऱ्यांना सादर केले. वेतनश्रेणीतील विसंगतीमुळे लिपिक संवर्गावर अन्याय होत असल्याचे आंदोलनकर्त्यांचे म्हणणे आहे. या आंदोलनात पंचायत समितीचे भूपेंद्र बाविस्कर, जितेंद्र पवार, दिनेश लोखंडे, सुदर्शन पाटील, रियाज काझी, अविनाश चौधरी, नदीम बेग मिर्झा, किरण साळुंखे, श्रीमती मीनाक्षी मोरे, भारती वाडेकर, व्यंकटेश चौधरी, भाऊसाहेब पाटील, महेश कंखरे, अमोल लोखंडे, कल्पेश चौधरी आदी कर्मचारी सहभागी झाले आहेत.

कर्मचाऱ्यांच्या मागण्यांवर प्रशासनाने सकारात्मक भूमिका घ्यावी, अशी अपेक्षा आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली आहे. दरम्यान, आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर कार्यालयीन कामकाजावर काही प्रमाणात परिणाम झाल्याचे चित्र दिसून येत आहे.

# अभाविपच्या लढ्यामुळे अखेर प्राचार्याचे निलंबन

## अभाविपच्या शिष्टमंडळाने घेतली पोलिस अधीक्षकांची भेट; चौकशीची मागणी, विद्यार्थी स्वाभिमान आंदोलनला यश

प्रतिनिधी । जळगाव

**गुलाबराव देवकर फार्मसी महाविद्यालयातील प्राचार्यांकडून झालेल्या अमानुष मारहाणीमुळे एका विद्यार्थ्याने आत्महत्या केल्याची अत्यंत दुर्दैवी घटना घडली. यानंतर सामान्य विद्यार्थ्यांमध्ये तीव्र संताप आणि वेदनेचे वातावरण निर्माण झाले होते. अभाविपने देवकर फार्मसी महाविद्यालयासमोर आंदोलन करीत प्राचार्याचे निलंबन व या घटनेची स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी करून कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी केली. विद्यार्थ्यांच्या सर्व मागण्या मान्य केल्या आहेत.**




अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (अभाविप) तर्फे विद्यार्थी स्वाभिमान आंदोलन आयोजित करण्यात आले. विद्यार्थ्यांचा सन्मान व सुरक्षिततेच्या प्रश्नावर ठाम भूमिका घेत मोठ्या संख्येने विद्यार्थी आंदोलनात सहभागी झाले. संबंधित विद्यार्थ्याचे कुटुंबीयही आंदोलनात उपस्थित राहून न्यायाची मागणी करत होते.
अभाविपने संस्थाचालक व प्रशासनाकडे निष्पक्ष चौकशी, संबंधितांवर तात्काळ निलंबनाची कारवाई, तसेच भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी ठोस उपाययोजना राबविण्याची मागणी केली होती. आंदोलनाच्या तीव्रतेनंतर महाविद्यालय प्रशासनाने सकारात्मक भूमिका घेत संबंधितांचे निलंबन जाहीर केले असून विद्यार्थ्यांच्या प्रमुख मागण्या जसे तक्रार निवारण पद्धतीचे सक्षमीकरण व समुपदेशन केंद्र सुरू करण्यात यावे, अशा मागण्या करण्यात आल्या. यावेळी देवकर कॉलेज प्रशासनाने संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. याच अनुषंगाने अभाविपच्या शिष्टमंडळाने पोलिस अधीक्षक यांची भेट घेऊन स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी करून कायदेशीर कारवाई करण्याबाबत निवेदन सादर केले. संबंधित कुटुंबाला न्याय मिळावा व दोषींवर कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी करण्यात आली. या वेळी अभाविप देवगिरी प्रदेश मंत्री डॉ.वरुणराज नन्नवरे, जळगाव महानगरमंत्री चिन्मय महाजन, सहमंत्री शारदा पाटील, वरद पांढारकर, शुभम बारी, आदित्य जाधव व इतर कार्यकर्ते उपस्थित होते. झालेली घटना अत्यंत दुर्दैवी आहे. विद्यार्थ्यांचा सन्मान आणि सुरक्षिततेच्या प्रश्नावर अभाविप कधीही तडजोड करणार नाही,अशी भूमिका अभाविप देवगिरी प्रदेश मंत्री डॉ. वरुणराज नन्नवरे यांनी मांडली.

# चोपडा ग्रामीण पोलिस ठाण्याचे दोन्ही हेड कॉन्स्टेबल निलंबित

## महिन्याभरात तिसरी शिस्तभंगाची कारवाई; जिल्हाभरात उडाली खळबळ

प्रतिनिधी । चोपडा

**कायदा आणि सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी असलेल्या पोलिस दलातच शिस्तभंगाचा धक्कादायक प्रकार उघडकीस आल्याने चोपडा तालुक्यात एकच खळबळ उडाली आहे. चोपडा ग्रामीण पोलीस ठाणे येथे कार्यरत असलेल्या दोन हेड कॉन्स्टेबल यांच्यात झालेल्या 'सिनेस्टाईल' हाणामारी प्रकरणी अखेर दोघांनाही निलंबित करण्यात आले आहे. या घटनेमुळे जिल्हा पोलिस दलाची प्रतिमा पुन्हा एकदा चर्चेत आली आहे.**

ग्रामीण पोलीस ठाण्यात मागील पाच ते सहा वर्षांपासून कार्यरत असलेले हेड कॉन्स्टेबल शशिकांत पारधी आणि राकेश पाटील यांच्यात ड्युटी वाटप, हजेरी नोंद व अंतर्गत कामकाजाच्या कारणावरून काही दिवसांपासून वाद सुरू असल्याची माहिती सूत्रांनी दिली. किरकोळ कारणावरून सुरू झालेला वाद चिघळत जाऊन अखेर पोलीसं ठाण्याच्या आवारातच जोरदार धक्काबुक्की आणि हाणामारीत परिवर्तित झाला. काही कर्मचाऱ्यांनी मध्यस्थी करत परिस्थिती नियंत्रणात आणली; मात्र या घटनेची माहिती बाहेर पडताच तालुक्यात चर्चा रंगली. घटनेची गंभीर दखल घेत वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तात्काळ चौकशीचे आदेश दिले. प्राथमिक चौकशीनंतर दोन्ही हेड कॉन्स्टेबल यांना निलंबित करण्यात आले. तसेच भारतीय न्याय संहिता कलम १९४(२) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आल्याची अधिकृत माहिती पोलिस निरीक्षकांनी दिली. विभागीय चौकशीही सुरू असून पुढील कारवाई अहवालानुसार करण्यात येणार आहे. दरम्यान, मागील एका महिन्यात चोपडा तालुक्यातील तिसरे निलंबन ठरल्याने पोलिस विभागात अस्वस्थता पसरली आहे. यापूर्वी शहर पोलीस ठाण्यातील एका हेड कॉन्स्टेबलवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात आली होती. सलग होत असलेल्या कारवायांमुळे पोलिस दलातील अंतर्गत शिस्तीबाबत



प्रश्न उपस्थित केले जात आहेत. कायद्याचे पालन करणाऱ्यांकडूनच अशा घटना घडल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. पोलिस दलाची विश्वासार्हता अबाधित ठेवण्यासाठी वरिष्ठांनी कठोर भूमिका घेणे आवश्यक असल्याची भावना नागरिकांतून व्यक्त केली जात आहे.

### ➤ वरिष्ठांची कठोर भूमिका हवी

**कायद्याचे पालन करणाऱ्यांकडूनच अशा घटना घडल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. पोलिस दलाची विश्वासार्हता अबाधित ठेवण्यासाठी वरिष्ठांनी कठोर भूमिका घेणे आवश्यक असल्याची भावना नागरिकांतून व्यक्त केली जात आहे. पुढील चौकशी अहवालाकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. चोपड्यात महिनाभरात तीन कॉन्स्टेबल निलंबित झाल्याने खळबळ उडाली आहे.**

## रोझोदा येथील प्रगती विद्यालयात बक्षीस वितरण

प्रतिनिधी । खिरोदा

रोझोदा येथील लोक शिक्षण मंडळ संचालित प्रगती विद्यालयात वार्षिक बक्षीस वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष जे. के. पाटील तसेच महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक संघाचे उपाध्यक्ष ललित चौधरी आणि रावेर पुरवठा निरीक्षक म्हणून कार्यरत असलेल्या व नुकत्याच एम.पी.एस.सी.द्वारे राज्य कर निरीक्षक म्हणून उत्तीर्ण झालेल्या कु. डाळिंबी रवींद्र सरोदे उपस्थित होत्या. कार्यक्रमात गुणवंत विद्यार्थ्यांना बक्षीस देऊन त्यांचा गुण गौरव करण्यात आला.

यावेळी पालक, ग्रामस्थ व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पुतळ्याची विटंबना करणाऱ्यावर कारवाई करा

**जामोद** । बुलढाणा जिल्ह्यातील जळगाव जामोद येथे एका व्यक्तीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे विटंबना केल्याची घटना घडली आहे. त्याच्या निषेधार्थ येथील मागासवर्गीय समाज बांधवांनी आज तहसीलदारांना लेखी निवेदन देऊन त्या संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

## ● निधन वार्ता

### गं.भा.रत्नाबाई पाटील

**चोपडा** । तालुक्यातील घोडगाव येथील गं. भा रत्नाबाई पांडुरंग पाटील (वय ९५)यांचे वृध्दापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्या सेवानिवृत्त शिक्षक राजेंद्र पांडुरंग पाटील व घोडगाव येथील माजी ग्रामपंचायत सदस्य विजय पाटील यांच्या मातोश्री होत.



# विटनेर जिल्हा परिषद शाळेचा सांस्कृतिक सोहळा उत्साहात



प्रतिनिधी । चोपडा

**घोडगाव परिसरातील विटनेर येथील जिल्हा परिषद शाळेचा वार्षिक सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. माझी शाळा सुंदर शाळा' या तालुकास्तरीय उपक्रमात प्रथम क्रमांक मिळवलेल्या शाळेने जिल्हास्तरावरही अव्वल स्थान मिळवावे, अशी अपेक्षा जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षणाधिकारी निलेश पाटील यांनी व्यक्त केली.**

कार्यक्रमात मार्गदर्शन करताना त्यांनी मराठी माध्यमाच्या शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. अधिकारी म्हणून सर्व शाळा प्रिय असल्या तरी जिल्हा परिषदेच्या मराठी शाळा माझी माय आहेत, असे भावनिक उद्गार त्यांनी काढले. पालकांनी इंग्रजी माध्यमाचा निर्णय घेताना विचारपूर्वक पाऊल उचलावे व मुलांचा भक्कम पाया मातृभाषेत घालावा, असा सल्लाही त्यांनी दिला. शाळेसाठी आधुनिक प्रयोगशाळा उपलब्ध करून देण्याची घोषणाही त्यांनी यावेळी केली. गावाने शाळेकडे लक्ष दिल्यास त्या गावाची प्रगती निश्चित होते, असे सांगत त्यांनी शिक्षक, पालक व ग्रामस्थांनी संयुक्तपणे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन केले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गणेश एकनाथ पाटील होते. मुख्याध्यापक हेमंत भामरे यांनी प्रास्ताविकातून शाळेच्या प्रगतीचा आढावा मांडला. यावेळी विविध मान्यवर, ग्रामपंचायत सदस्य तसेच माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी विशेष कृतिदलासोबत केली चर्चा

प्रतिनिधी । चोपडा

**राज्यातील वाढत्या शेतकरी आत्महत्यांच्या पार्श्वभूमीवर आयुक्तालयाने स्थापन केलेल्या विशेष कृती दल (टास्क फोर्स) सोबत शेतकरी कृती समितीची महत्त्वपूर्ण चर्चा पार पडली.या कृती दलाचे अध्यक्ष रफीक नाईकवाडी (संचालक, विस्तार व प्रशिक्षण) तसेच सदस्य सुनील बोरकर (संचालक, आत्मा) यांच्यासमवेत समितीचे प्रतिनिधी एस. बी. पाटील यांनी विविध मुद्द्यांवर सविस्तर मांडणी केली.**

चर्चेदरम्यान बँकांनी रिझर्व्ह बँकेच्या १ जुलै २०१५ च्या मास्टर सर्क्युलरनुसार नैसर्गिक आपत्तीच्या काळात कर्जपुनर्गठन व सवलती देण्याचे नियम पाळले



नसल्याचा आरोप करण्यात आला. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांचे कर्जबोजा वाढून त्यांचे सिबील स्कोअरही खराब झाल्याचे नमूद करण्यात आले. या संदर्भात औरंगाबाद खंडपीठाच्या पीआयएल ०५/२०१६ मधील ०७/२०१७ च्या अंतरिम आदेशाची अंमलबजावणी झाल्यास शासनावरील आर्थिक भार कमी होऊन आत्महत्या रोखण्यास मदत होईल, असे समितीने स्पष्ट केले.

## मुक्ताईनगरात कॉपी पुरवणाऱ्या १५ जणांवर गुन्हा दाखल

**मुक्ताईनगर :** कॉपी पुरविण्याचा प्रयत्न, परीक्षा केंद्राचे नुकसान; १५ जणांवर गुन्हा दाखल मुक्ताईनगर । प्रतिनिधी शहरातील जे.ई. स्कूल येथे सुरू असलेल्या बारावीच्या परीक्षा केंद्रावर दि.१६ रोजी सुरु असलेल्या भौतिकशास्त्राच्या पेपर दरम्यान परीक्षा केंद्रात अनधिकृत प्रवेश करून, तर काहींनी कॉपी पुरवण्याचा प्रयत्न केला म्हणून तसेच परीक्षा केंद्राच्या खिडक्यांची व लोखंडी गेटची तोडफोड करून नुकसान केल्या प्रकरणी १७ रोजी अफसर खानसह १५ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# अडावद येथे सोहम पाटील यांचे व्याख्यान

प्रतिनिधी । चोपडा

**धर्मवीर बलिदान मासानिमित्त अडावद येथे ह.भ.प. सोहम दादा पाटील (धाराशिवकर) यांचे प्रेरणादायी व्याख्यान उत्साहात संपन्न झाले.**

अडावद दि. १७ फेब्रुवारी रोजी मुरलीधर मंदिराच्या पटांगणावर आयोजित या कार्यक्रमाला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. व्याख्यानात त्यांनी छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनकार्याचा सखोल आढावा घेतला. संभाजी महाराजांचे शौर्य, अदम्य धैर्य, राष्ट्रनिष्ठा आणि धर्मरक्षणासाठी दिलेले बलिदान यांची प्रभावी मांडणी त्यांनी केली. इतिहासातील विविध प्रसंग, दाखले आणि मार्मिक उदाहरणांच्या माध्यमातून त्यांनी संभाजी महाराजांचे व्यक्तिमत्त्व जिवंत केले. आजच्या तरुण पिढीने इतिहासातून प्रेरणा घेत स्वाभिमान, कर्तव्यनिष्ठा आणि राष्ट्रप्रेम जपावे, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. त्यांच्या ओजस्वी आणि अभ्यासपूर्ण वक्तृत्वामुळे श्रोते भारावून गेले. कार्यक्रमास गावातील नवतरुण, ज्येष्ठ नागरिक, माता-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# तरुणांनी उद्योग व्यवसायात वळावे : आ.अमोल पाटील

प्रतिनिधी । पारोळा

**महाराष्ट्र शासनाच्या वतीने आयोजित करण्यात आलेला तालुकास्तरीय कर्ज मेळावा पंचायत समिती कार्यालय येथे उत्साहात संपन्न झाला. हा मेळावा जिल्हा उद्योग केंद्र, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ आणि महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आला होता. मेळाव्याचे अध्यक्ष पारोळा तालुक्याचे आ. अमोल पाटील हे होते.**

जिल्हा उद्योग केंद्राचे व्यवस्थापक ए. टी. पाटील, खादी ग्रामोद्योग मंडळाचे सहाय्यक जिल्हा ग्राम उद्योग अधिकारी जगदीश पाटील, प्रकल्प अधिकारी विजय सैंदाणे, तालुका समन्वयक समीर भाटिया, जिल्हा उद्योग निरीक्षक शरद लासूरकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. या प्रसंगी




विविध शासकीय योजनांअंतर्गत युवक-युवती, महिला बचतगट, उद्योजक आणि स्वयंरोजगार इच्छुकांना कर्ज व अनुदान योजनांची सविस्तर माहिती देण्यात आली. शासनाच्या योजनांचा लाभ तळागाळातील सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी अशा मेळाव्यांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. मार्गदर्शन करताना उपस्थित मान्यवरांनी स्थानिक युवकांना उद्योजकतेकडे वळण्याचे आवाहन केले. स्थानिक युवकांनी केवळ नोकरीच्या मागे न धावता उद्योजकतेचा मार्ग स्वीकारावा. शासन विविध योजनांच्या माध्यमातून भांडवल, प्रशिक्षण आणि आवश्यक मार्गदर्शन उपलब्ध करून देत आहे. योग्य नियोजन, प्रामाणिक प्रयत्न आणि शासनाच्या सहाय्यामुळे निश्चितच यश संपादन करता येते, असे मत व्यक्त करण्यात आले. मेळाव्यादरम्यान संबंधित अधिकाऱ्यांना लाभार्थ्यांच्या प्रस्तावांची त्वरित छाननी करून पात्र लाभार्थ्यांना लवकरात लवकर कर्ज वितरण करण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच लाभार्थ्यांशी संवाद साधून त्यांच्या शंका व समस्या जाणून घेण्यात आल्या.

# वरणगाव महाविद्यालयात नशा मुक्त अभियान

प्रतिनिधी । वरणगाव

**येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे नशा मुक्त युवक या अत्यंत महत्त्वपूर्ण आणि समकालीन विषयावर विविध जनजागृतीपर कार्यक्रमांचे भव्य आयोजन करण्यात आले. वाढत्या व्यसनाधिनतेच्या पार्श्वभूमीवर आयोजित या अभियानाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. संपूर्ण महाविद्यालय परिसरात व्यसनमुक्तीचा सकारात्मक संदेश घुमत होता.**

कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यार्थ्यांनी व्यसनमुक्तीविषयी जनजागृती करणारे फलक, घोषवाक्ये




व पोस्टर्स सादर केले. नशा सोडा, भविष्य घडवा', सुदृढ युवक सक्षम राष्ट्र' अशा प्रभावी संदेशांमुळे उपस्थितांमध्ये जागरूकता निर्माण झाली.

` उपप्राचार्य डॉ.अशोक चित्ते यांनी विद्यार्थ्यांना सांगितले की, नशा ही आजच्या समाजासमोरील गंभीर सामाजिक व आरोग्यविषयक समस्या आहे. व्यसनामुळे युवकांचे शारीरिक, मानसिक आणि आर्थिक नुकसान होते. अनेक तरुण क्षणिक आकर्षणामुळे व्यसनाच्या आहारी जातात आणि त्यांचे भविष्य अंधकारमय होते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी योग्य संगत, सकारात्मक विचार आणि आरोग्यदायी जीवनशैली अंगीकारणे आवश्यक आहे.

# महावितरणच्या धडक तपासणी मोहिमेत वीज चोरीचा पर्दाफाश

## वरणगाव विभागात धडक कारवाई; दोषींवर होणार कारवाई

प्रतिनिधी । वरणगाव

**महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित (महावितरण) वरणगाव उपविभागात आज शहरातील विविध भागांत वीज ग्राहकांची धडक तपासणी मोहीम राबवली गेली. या मोहिमेत अनेक ग्राहक वीज चोरी करताना पकडले गेले, त्यांच्यावर तत्काळ प्रशासकीय कारवाई करण्यात आली.**

ही महत्त्वाची कारवाई कार्यकारी अभियंता चव्हाण यांच्या



मार्गदर्शनाखाली पार पडली.

यामध्ये उपकार्यकारी अभियंता पंचबुद्धे, सहाय्यक अभियंते आशिष कुंभारे, सुंदराणी, कुलकर्णी, जयदीप पाटील, तंत्रज्ञ नदीम काजी तसेच इतर जनमित्रांचा सहभाग होता. मोहिमेत टीमने शहरातील वीज ग्रिडसह विविध भागांत फेरफटका मारत ग्राहकांची तपासणी केली. यात अनधिकृत वीज वापराचे अनेक प्रकरणे उघडकीस आली. तपासणीत वीज चोरी करणाऱ्या ग्राहकांना त्यांच्या अनधिकृत वापरानुसार दंड आकारला जाणार आहे. संबंधितांनी दंड न भरल्यास त्यांच्याविरुद्ध २००३ अंतर्गत गुन्हे दाखल केले जातील, असा इशारा देण्यात आला आहे.

**जनतेसाठी इशारा**

महावितरणने नागरिकांना आवाहन केले आहे की, वीज चोरी करणाऱ्यांबाबत माहिती असल्यास तात्काळ स्थानिक उपविभागात किंवा ग्राहक सेवा केंद्रात माहिती द्यावी. तसेच, सर्व वीज ग्राहकांनी नियमांचे पालन करावे आणि अनधिकृत वीज वापर टाळावा, असे सांगितले आहे.

### ➤ वीज चोरीचे गंभीर परिणाम

**महावितरणचे अधिकारी सांगतात की, वीज चोरीमुळे फक्त कंपनीच्या आर्थिक नुकसानाचे प्रमाण वाढत नाही, तर प्रामाणिक ग्राहकांवर अतिरिक्त बोजा पडतो. वीज पुरवठा अस्थिर होतो, ट्रान्सफॉर्मर्सवर ताण येतो आणि संपूर्ण शहरातील वीज सेवा प्रभावित होते. त्यामुळे अशा बेकायदेशीर प्रकारांना आळा घालणे महावितरणसाठी अत्यंत आवश्यक आहे. महावितरणकडून दिलेल्या माहितीनुसार, ही तपासणी मोहीम पुढील काळातही सातत्याने सुरू राहणार आहे.**

# फुलगाव येथे आज संदल मिरवणूक

प्रतिनिधी । भुसावळ

**तालुक्यातील फुलगाव येथील छोटी उजनी दरगाह शरिफमध्ये गुरुवार, दि. १९ फेब्रुवारी रोजी हजरत ख्वाजा न्यामतुल्ला शाहवादी सरकार यांचा वार्षिक संदल सोहळा आयोजित केला जाणार आहे.**

भव्य मिरवणूक आणि लंगर – संदल सोहळ्याच्या निमित्ताने दरगाह येथे दुपारी २ ते ६ या वेळेत भव्य संदल मिरवणूक काढण्यात येणार आहे. तसेच सायंकाळी ६ ते ९ या वेळेत भाविकांसाठी लंगर (प्रसाद)चे आयोजन करण्यात आले आहे. शानदार कव्वाली कार्यक्रम – सोहळ्याच्या कार्यक्रमात प्रसिद्ध



कव्वाल शमा मैफल यांच्या शानदार कव्वालीचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामुळे परिसरात भक्तिभाव आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. पीर साहेब महावीर फकीर यांनी सर्व भाविकांना आवाहन केले आहे की, या संदल सोहळ्यात परिसरातील तसेच दूरदूरच्या भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे. असे आयोजकांकडून कळवण्यात आले आहे.